। शीलं परं भूषणम ।

श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ कोडोली संचलित

# यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय कोडोली

ता. पन्हाळा जि. कोल्हापूर [महाराष्ट्र] ४१६ ११४

आयुष विभाग व सी.सी.आय.एम.नवी दिल्ली, व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्नित.

(०२३२८) २२२०८८,२२२०८९ २२४१४६ २२४७६३ फॅक्स नं.२२२०८८ २२२०८९

Website: www.yackodoli.com E-Mail: - yamkodoli@gmail.com

जा.क्र.-यआमको / ७७४/ २०२१ दिनांक ०६/०७/२०२१

**विषय :- कोविड १९ काळात महाविद्यालय व रूग्णालयामार्फत केलेल्या कामकाजाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळवू इच्छितो की, आमच्या महाविद्यालय व रूग्णालयामार्फत संस्थेच्या अन्य स्वतंत्र इमारतीमध्ये १०० बेडचे स्वतंत्र डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल सुरू करणेत आले आहे. या हॉस्पिटलचे उदघाटन राज्याचे आरोग्य राज्यमंत्री मा.राजेंद्र पाटील यड्रावकर, गृह राज्यमंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री सतेज पाटील, कोल्हापूरचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ योगेश साळे, संस्थेचे सचिव डॉ जयंत पाटील, विभागीय दंडाधिकारी अमित माळी व तहसिलदार रमेश शेडगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत दि १३ ऑगष्ट २०२० रोजी उदघाटन करणेत आले आहे.

या कोविड हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजनची सुविधा असलेले ४७ बेड उपलब्ध करणेत आले आहेत व उर्वरित ५३ बेड हे नॉन ऑक्सिजनचे ठेवणेत आले आहेत. या रूग्णालयात दोन अद्यावत व्हेंन्टीलेटर, दोन एन. आय. व्ही. मशीन, तीन हायप्लो मास्क,रूग्णालय आवारात २४ तास ॲम्प्युलन्स व शववाहिका अशा विविध सुविधा उपलब्ध करणेत आले आहेत. रूग्णांच्या प्रकृतीची माहिती नातेवाईकांना देणेसाठी स्वतंत्र कक्षाची सोय केली आहे. कोविड हॉस्पिटल मध्ये सर्वसाधारण २८० रूग्ण दाखल झाले होते. तर २५६ रूग्ण कोरोना मुक्त झाले आहेत. कोविड रूग्णांच्या सेवेसाठी महाविद्यालय व रूग्णालयात अध्यापक व अध्यापकेत्तर कर्मचारी व रूग्णालयीन कर्मचारी वर्गानी अथक परीश्रम घेतले आहे. कोविड हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचा दोन लाख रूपयाचा एक वर्षाचा विमा उतरविला आहे. कार्यरत कर्मचा-याना

रूग्णालय परीसरात स्वतंत्र इमारतीमध्ये रहाणेची व जेवणाची सुविधा दिली आहे.शासनाच्या नियमानुसार क्वारंनटाईन पध्दत कार्यन्वित केली आहे. तसेच कर्मचा-यांना रोगप्रतिकार शक्ती वर्धक औषधे, स्टीम मशीन उपलब्ध केली आहेत.सर्वसाधारण रूग्णांची गैरसोय होवू नये यासाठी महाविद्यालयाचे पुर्वीपासून सुरू असलेले रूग्णालय पुर्ण क्षमतेने नियमित सुरू ठेवणेत आले आहे. या रूग्णालयास कोल्हापूरचे जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परीषदेचे कार्यकारी अधिकारी डॉ अमन मितल,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ योगेश साळे, तसेच शासनामार्फत नियुक्त केलेले अधिकारी यांनी वेळोंवेळी रूग्णालयास भेट देवून कोविड काळातील रूग्णालयाच्या कामकाजाबाबत प्रशंसा केली आहे.

कळावे

आपला विश्वासू

डॉ मिलींद गोडबोले
प्राचार्य
यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय,
कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर